जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय
नगर परिषद, प्रशासन विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर (नगर पालिका प्रशासन )
फोन क्रमांक.०२३८२ -२२०२०४
जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर
नगर परिषद राज्यस्तरीय संवर्गातील (श्रेणी-क) गट-क पदांची पदभरती २०१६

जाहिरात क्रमांक /२०१६/नपाप्र/सीआर-८ दिनांक २९.०९.२०१६

# जाहिरात शुध्दीपत्रक

जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर नगर परिषद राज्यस्तरीय संवर्गातील (श्रेणी-क) गट क रिक्त पदांची सरळसेवेने पद भरती २०१६ जाहिरात क्रमांक २०१६/नपाप्र/सीआर-८ दिनांक १६.९.२०१६ रोजी जाहीरात प्रसिध्द करण्यांत आलेली आहे. या जाहिरातीत नगर परिषद राज्य संवर्गातील श्रेणी-क मधील तांत्रिक पदासाठी शैक्षणिक अर्हता नमुद केलेली आहे. सदर पदांच्या शैक्षणिक पात्रतेच्या इतर समकक्ष शैक्षणिक अर्हता पदवी व पदवित्तर पदवी या बाबत या कार्यालयाकडे उमेदवांराकडुन लेखी, दुरध्वनीव्दारे व ई-मेलव्दारे विचारणा केली जात आहे. तसेच सदरील पदासाठी जिल्हाधिकारी बीड यांनी समकक्ष शैक्षणिक अर्हता गृहीत धरली आहे. त्यानुसार अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र अभ्यासक्रमाची समकक्षता निश्चीत करणे या विषयी **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचा शासन निर्णय क्रं.संकिण-२०१३/४५/१३/तां.शि.-२/मंत्रालय विस्तार भवन, मुंबई दिनांक २३ मे २०१४** अन्वये त्या त्या शैक्षणिक पदवी किंवा पदवित्तर पदवी समोर नमुद केलेल्या समकक्ष पदवी किंवा पदवित्तर पदवी त्या त्या रिक्त पदांच्या शैक्षणिक पात्रतेसाठी याव्दारे ग्राहय धरण्यांत येत आहे.

या शुध्दीपत्रकामुळे जाहीरातीत दिलेले रिक्तपदे भरण्याचा सुधारीत कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| ऑन लाईन अर्ज भरण्यांची अंतिम तारीख | दिनांक ०६.१०.२०१६ |
| परीक्षा शुल्क भरण्यांचा शेवटचा दिनांक | दिनांक ०८.१०.२०१६ |
| प्रवेश पत्र Online खालील दिनांकपासून उपलब्ध होतील | दिनांक १०.१०.२०१६ (सायं. ५.०० पासून) |
| 1) महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा(पाणी पुरवठा जलनिःसारण व स्वच्छता ) गट क (श्रेणी -क)<br>2) महाराष्ट्र नगर परिषद करनिर्धारक व प्रशासकीय सेवा गट क (श्रेणी –क-2)<br>3) महाराष्ट्र नगर परिषद अग्निशमन सेवा गट क(श्रेणी –क-2) | **परिक्षा दिनांक १६.१०.२०१६**<br>(जाहीरातीत दिल्याप्रमाणे कोणताच बदल न करता ) |
| 4) महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा(स्थापत्य) गट क(श्रेणी -क)<br>5) महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा(विद्युत) गट क (श्रेणी -क)<br>6) महाराष्ट्र नगर परिषद अभियांत्रिकी सेवा(संगणक) गट क(श्रेणी -क) | (दिनांक ०९.१०.२०१६ रोजीचा बदल करून )<br>**परीक्षेचा दिनांक २३.१०.२०१६** |

उपरोक्त शासन निर्णय व पदभरतीचा सुधारीत कार्यक्रम https://www.latur.nic.in तसेच https://npplatur.applygov.com या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यांत आला आहे.

दिनांक २९.०९.२०१६
स्थळः- लातूर

स्वाक्षरीत/-
जिल्हाधिकारी,लातूर तथा
अध्यक्ष जिल्हा निवड समिती, लातूर.

COLLECTOR OFFICE, LATUR

Est-40